विभागीय चौकशी बाबत. ( श्री अक्षय गौतम म्हस्के, परिचर, पंचायत समिती राहुरी )

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग - १
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/६/४४०/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरीत नमूद प्रमाणे

वाचा - १. इकडील आदेश क्र. साप्रवि -१/अ-४/५६/२०२२,दि.२८.०२.२०२२
२. इकडील आदेश क्र. साप्रवि -१/आस्था-४/०५२२/३१३/२०२२ दि. ०१/०७/२०२२
३. मा. विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांचेकडील अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी.आर. १११/२०२२ दि. २१/१०/२०२२
४. निलंबन आढावा समिती यांचेकडील आदेश क्र.मशा/पुनस्था-२०२३/प्र. क्र. १२/ ई-८/९३७६ दि. २१/१२/२०२३
५. इकडील आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१२४/२०२४ दि. ०२/०२/२०२४
६. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील दाखल फौजदारी खटला क्र. ३८४/२०२२ संदर्भात पारित निकाल दि. २०/०६/२०२६
७ विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील नियम ४.७ (१)
८. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे हया काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२(३)

श्री अक्षय गौतम म्हस्के, सेवानिलंबित परिचर, हे पंचायत समिती पाथर्डी येथे कार्यरत असताना, कौटुंबिक वादातुन पत्नीचा शारीरीक व मानसिक छळ केले प्रकरणी त्यांचे विरुध्द फौजदारी कार्यवाही होऊन तोफखाना पोलीस स्टेशन अहिल्यानगर येथे भा.दं.वि. कलम ४९८(अ),३२३,०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करणेत आला होता, सबब त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम (३) चा भंग केलेने संदर्भ ०१ अन्वये श्री. म्हस्के यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करण्यात येवुन पंचायत समिती कोपरगाव येथे मुख्यालय देण्यात आले होते.

सदर प्रकरणी इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्र. साप्रवि-१/आस्था-४/०५२२/२०८/२०२२ दि. २६/०४/२०२२ अन्वये बजाविण्यात येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. दि. ११/०५/२०२२ रोजी श्री. म्हस्के यांचा खुलासा प्राप्त झाला असून त्यांनी त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोन्ही आरोप अमान्य केले होते. त्यामुळे संदर्भ क्र.०२ अन्वये इकडील श्री. म्हस्के यांचेवर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली होती. सदर खातेचौकशी प्रकरणी वरील संदर्भ क्र.०३ नुसार विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांचेकडील अहवाल प्राप्त झाला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयीन निकालानंतरच अंतिम निर्णय घेणे संयुक्तिक राहील अशा निष्कर्ष दिला होता.

तसेच सदर प्रकरणी संदर्भ क्र. ०४ अन्वये विभागीय निलंबन आढावा समिती, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील आदेशानुसार, श्री. अक्षय गौतम म्हस्के, सेवानिलंबित परिचर, यांना संदर्भ क्र.०५ नुसार जिल्हा परिषद सेवेत सामावुन घेवुन पंचायत समिती राहुरी येथे परिचर गट (ड) या पदावर पुन:स्थापित करण्यात आले होते.

मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, अहिल्यानगर यांनी श्री. अक्षय गौतम म्हस्के, परिचर यांना फौजदारी खटला क्र. ३८४/२०२२ मध्ये दि. २०/०६/२०२६ रोजीच्या निकालानुसार निर्दोष मुक्त केलेले आहे. सबब संदर्भ क्र.०७ मध्ये नमूद केलेल्या नियमातील तरतुदींनुसार फौजदारी न्यायालयाच्या निष्कर्षाशी सहमती दर्शविण्यात येवून मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, सदर प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम

१९६४ नुसार मला प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री अक्षय गौतम म्हस्के, परिचर यांना सदर विभागीय चौकशी प्रकरणातून दोष मुक्त करण्यात येवून विभागीय चौकशी बंद करण्यात येत आहे.

सबब, श्री अक्षय गौतम म्हस्के यांचा उक्त संदर्भ क्र.०८ नुसार दिनांक ०४/०३/२०२२ ते दिनांक ०८/०२/२०२४ अखेर सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवा कालावधी समजण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री म्हस्के अक्षय गौतम, परिचर, पंचायत समिती राहुरी, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक क्र. 202608100401143 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 10-08-2026 21:38:47
आनंद भंडारी, ( भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री अक्षय गौतम म्हस्के, परिचर पंचायत समिती राहुरी

व्दारा व प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी

२/- सदर आदेश संबंधीतांना बजावून त्यांची एका प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेण्यात यावी व स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत - सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक

प्रत - निवड नस्ती

स्वाक्षरीत /--
आनंद भंडारी, ( भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर